विश्वाच्या मातीत रुजलेल्या या सनातन वृक्षाला
जेव्हा पहिली-वाहिली पाने फुटली, दोन,
हसू आणि रडू
तेव्हा माणसाच्या शरीर संवेदना जागृत झाल्या;
म्हणतात, की, माणसाला माणूस भेटू लागला.

याच घटनेने, खोलवर रुजलेल्या या वृक्षाला
आणखी दोन पाने तरारून फुटली, तेव्हा
माणसाच्या दोन वृत्ती जन्माला आल्या,
हिंसा आणि अहिंसा.
पुढे हिंसा वांझ ठरली मानवी जीवनवृद्धीसाठी;
तेव्हा, अहिंसेलाच दोन पाने नवीन फुटली
सहानुभूती आणि करुणा.
म्हणतात की, माणसाला माणूस जवळ वाटू लागला.

माणसे सहानुभूतीने परस्परांशी वागू लागली,
तेव्हा करुणेला पाझर फुटल्याने, सनातनवृक्ष
भिजून गेला; आणि त्याला पाने फुटली दोन
एक प्रेम आणि दुसरी क्षमा.
आता तर माणसे माणसांसाठीच जगू लागली,
माणसांशी माणसांसारखे वाग लागली.

आता सनातनवृक्ष बहरतोय.
म्हणतात की, लोकांनी त्याचे नामकरण केले
माणुसकीचा मानसवृक्ष, म्हणून !

२४.१.२०१९